**अर्ज आयडीए क्र. १/२०१७**
**सीएनआर नं. MHLC080000192017**

## नि. सी – १२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी अर्ज (औविअ) क्र. ३/२०१५ मधील रक्कम रु. १,९२,९४७/– वसुलीच्या कार्यवाहीस स्थगिती मिळण्यासाठी दाखल केला आहे.

सामनेवाला क्र. १ ते ४ यांचे कथन असे आहे की, मुळ अर्ज अंशतः मंजुर केला असुन अर्जामध्ये नमुद केलेली रक्कम अर्जदाराला दयावा असा आदेश नाही. उलट नियमांच्या अधीन राहुन सर्व कागदपत्रांची योग्य पुर्तता केलेली आहे किंवा नाही याची छाननी करुन सामनेवालाने अर्जदाराच्या वैदयकीय बिलाची प्रतीपुर्ती करुन दयावी असे निर्देश देणे योग्य आहे व असा निष्कर्ष न्यायालयाने नोंदविलेला आहे. अर्जदार यांनी सामनेवाला यांना नोटीस पाठविली त्यामध्ये १,९२,९४७/– मागणी केली आहे. त्या नोटीसीला सामनेवाला यांनी उत्तर दिले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार सामनेवाला कार्यालयाने नियमांच्या अधीन राहुन अर्जदार यांच्या वैदयकीय बिलाची छाननी केलेली असुन सामनेवाला कार्यालय यांना रक्कम रु. २००००/– देय लागतात. ती रक्कम सामनेवाला देण्यास तयार आहे. दि. १५/०३/२०१२ ते १९/०३/२०१२ पर्यंत केएलइएस रुग्णालय, बेळगांव येथे अर्जदाराने उपचार घेतले आहेत. नियमानुसार अर्जदाराला २०,०००/– रुपयेच सामनेवाला देय लागतात. न्यायालयाने थकीत रक्कम वसुलीसाठी जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्याकडे प्रकरण सोपविले आहे. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना रु. १,९२,९४७/– ही रक्कम जी मुळात मंजुर केलेली नसताना त्यांना वसुलीचे अधिकार नाहीत. सबब रक्कम रु. १,९२,९४७/– च्या वसुलीच्या आदेशाला स्थगिती दयावी अशी मागणी केली आहे.

LABOUR COURT

या अर्जास विरोध करुन अर्जदार यांनी यु—१० ला म्हणणे दाखल केले आहे. अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, मुळ अर्ज औविअ ३/२०१५ वरील आदेशाविरुध्द सामनेवाला यांनी अपील केलेले नाही. त्यामुळे कामगार न्यायालय यांचा निर्णय कायम झाला असुन तो सामनेवालावर बंधनकारक आहे. न्यायालयाने रक्कम वसुली केलेली कारवाई कायदेशीर असुन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तहसिलदार रत्नागिरी यांच्याकडुन वसुल होणे आवश्यक आहे आणि सामनेवाला यांनी आजपर्यंत कोणतीही रक्कम जमा केलेली नाही सबब सामनेवाला यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

सामनेवाला व अर्जदार यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे निश्चीत होतात. त्याचे निष्कर्ष मी कारणासहीत खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | किरकोळ अर्ज औविअ ३/२०१५ मधील रक्कम रु. १९२९४७/— ला स्थगिती देण्याची आवश्यकता आहे काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय आहे ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

उभय पक्षाचे वकिल यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

### <u>मुद्दा क्र. १</u>

यातील वस्तुस्थिती अशी की, अर्ज औविअ

क्र. ३/२०१५ मधील न्यायनिर्णय दि. १९/११/२०१६ रोजी घोषीत झाला असुन तेव्हापासुन आजपर्यंत सामनेवाला यांनी अपील केलेले नाही. त्यामुळे कायदयाने हा निर्णय कायम आहे. सामनेवाला यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तहसिलदार यांच्याकडे वसुलीसाठी गेले असताना सामनेवाला यांनी सी–१२ चा अर्ज दिला आहे. या अर्जाला अर्जदाराने जोरदार हरकती घेतल्या आहेत.

सामनेवाला यांच्या वकिलांनी न्यायनिर्णयाकडे लक्ष वेधले. त्यामुळे किरकोळ अर्ज नं. ३/२०१५ मधील न्यायनिवाडयाचे अवलोकन स्थगिती अर्जाचा अर्जाचा विचार करताना केले. सामनेवाला यांच्या म्हणण्यानुसार शासनाच्या परिपत्रकानुसार केवळ रक्कम रु. २००००/– देय लागतात. सामनेवाला यांच्या म्हणण्यानुसार अर्ज औविअ क्र. ३/२०१५ मधील न्यायनिर्णय हा सामनेवाला यांच्या बाजुने असुन सामनेवाला यांना कोणतेही अपील करण्याची आवश्यकता नाही. सामनेवाला यांच्या वकिलांनी अर्ज अंशत: मंजुर केला आहे व अर्जदारांनी वैदयकीय बिलांच्या अधीन राहुन कागदपत्रांची छाननी करुन अर्जदार यांच्या मागणीनुसार देय असलेली रक्कम अर्जदारास दयावी या आदेशाकडे तसेच मुद्दे आणि निष्कर्ष याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष माझे पुर्वाधिकारी यांनी अंशतः होय असा नोंदविला आहे. या अनुषंगाने सामनेवाला यांच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, सामनेवाला केवळ अर्जदाराला रु. २००००/– देणे लागतात. रक्कम रु. १९२९४७/– देणे लागत नाहीत. त्यातील वस्तुस्थिती अशी दिसुन येते की, निष्कर्षा मधील अंशतः या शब्दामुळे उभय पक्षाच्या वकिलांनी खुप युक्तीवाद केलेला आहे. परंतु न्यायनिर्णयामधील अवलोकन केले असता सामनेवाला यांचे रु. २००००/– चे देणे लागतो ही मागणी मान्य केलेली

नाही. उलट अर्जदाराने सादर केलेल्या वैदयकीय बिलाच्या नियमाच्या अधीन राहुन कागदपत्राची छाननी करुन रक्कम रु. १,९२,९४७/— इतकी अर्जदारास देणे आवश्यक आहे. वैदयकीय बिले सामनेवालाकडे अर्जदाराने दिले आहेत व त्याची छाननी केली आहे असे अर्ज सी—११ मधील कथनावरुन दिसुन येते. अर्जदार याने त्याअर्थी कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे व देय रक्कम रु. १९२९४७/— अर्जदारांनी मागणी केली होती. या अनुषंगाने माझे पुर्वाधिकारी यांनी नि. ओ—५ए ला अर्जदाराने दिलेला दाखला याचे अवलोकन करण्यात आले. त्यामध्ये माझे पुर्वाधिकारी यांनी रक्कम रु. १९२९४७/— इतकी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्यामार्फत वसुल करण्यासाठी दाखला नि. ओ—५ए ला दिला आहे. न्यायनिर्णय आणि दाखला यांचे अवलोकन केले असता रक्कम रु. १९२९४७/— सामनेवाला अर्जदारांना देय लागतात असे आढळुन येते. न्यायनिर्णयाचा फेरविचार करताना दिवाणी कायदे संहिता कलम ११४ आणि ४७ या तरतुदींचा आधार घ्यावा लागतो. ज्या अर्थी सामनेवाला यांनी किरकोळ अर्ज ३/२०१५ मधील न्यायनिर्णयाविरुध्द अपील दाखल केलेले नाही. त्याअर्थी अर्जदाराने या न्यायासमोर दाद फेरविचारासाठी मागणी केलेली आहे. न्यायनिर्णयामधील देय असलेली रक्कम १९२९४७/— ही दाखला नि. ओ—५ए अन्वये आहे असे निदर्शनास आले आहे. किरकोळ अर्ज नं. ३/२०१५ मधील अंतिम आदेश की, अर्जदारांनी सादर केलेल्या वैदयकीय बिलाच्या अधीन राहुन कागदपत्रांची छाननी करुन त्यांच्या मागणीनुसार देय असलेली रक्कम अर्जदारास दयावी या अंतिम आदेशाचे अंमलबजावणीसाठी वैदयकीय बिले सामनेवालाकडे छाननी करण्यासाठी देण्यात आले होते असे अर्ज सी—११ वरुन आढळते. मात्र सामनेवाला यांचे ठाम म्हणणे की, अर्जदाराला त्यांच्याकडुन रु. २००००/— च

LABOUR COURT

परिपत्रकानुसार देय लागतात. रु. २००००/— बद्दल माझे पुर्वाधिकारी यांनी न्यायनिर्णय परिच्छेद १७ मध्ये अवलोकन केले आहे.

न्यायनिर्णयाचा फेरविचार करीत असताना उभय पक्षकारांच्या वकिलांच्या युक्तीवादानंतर संपुर्ण कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन करण्यात आले. न्यायनिर्णयामधील अंतिम आदेश व पुर्वाधिकारी यांनी दिलेले सर्टीफिकेट यावरुन सामनेवाला क्र. १ ते ४ हे अर्जदारास रक्कम रु. १९२९४७/— देय लागतात. ज्या अर्थी अर्ज ३/२०१५ मध्ये न्यायनिर्णयाविरुध्द सामनेवाला यांनी अपील देवुन आव्हान केलेले नाही त्याअर्थी अर्ज क्र. ३/२०१५ मधील अंतिम आदेश तसेच पुर्वाधिकारी यांनी दिलेला दाखला हे निर्णय कायम असुन ते उभय पक्षकारावर बंधनकारक आहेत. त्यामुळे सामनेवालांचा फेरविचाराचा अर्ज नि. सी—११ नामंजुर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला यांनी दि. १९/११/२०१६ पासुन आजपर्यंत अर्जदारांना देय असलेली रक्कम रु. १९२९४७/— दिलेली नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्यामार्फत करण्यात येणा—या वसुलीला स्थगिती देणे न्यायोचित होणार नाही या निर्णयापर्यंत हे न्यायालय आले असुन मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे व मुद्दा क्र. २ च्या उत्तराकरिता मी न्यायाच्या कारणास्तव खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. सामनेवाला यांचा अर्ज नि. सी—१२ नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

Ananda Pandurang Mohite

Digitally signed by Ananda Pandurang Mohite
Date: 2019.09.23 17:13:02 +0530

(श्री आनंदा पां. मोहिते)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, रत्नागिरी

दिनांक :— २३/०९/२०१९.

LABOUR COURT